# Sant Gadge Baba Amravati University, Amravati

NAAC Accredited with "A"Grade

# ACE

(Academic, Co-curricular & Extra-curricular Activities of Students)

Volume 2 | Sant Gadge Baba Amravati University Bulletin | Issue - 1, May 2018


## स्वामी विवेकानंदांच्या शिकागो येथील भाषणातून विश्वबंधुत्वाचा संदेश -



सोमवार, ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो येथे स्वामी विवेकानंद यांनी धर्म परिषदेमध्ये भाषण केले आणि याच दिवशी विश्वबंधुत्वाचा शुभारंभ झाला. स्वामी विवेकानंदांनी 'भगिनींनो आणि बंधूनो' या शब्दांनी सुरूवात केली आणि एका क्षणात हजारो स्त्री-पुरूषांच्या ह्रदयात सारी मानवजात एक असल्याचा अनुभव तरळून गेला.

या स्थानावरून स्वामीजींनी जगाला संदेश दिला. ते म्हणाले, प्रत्येक धर्माच्या पताकेवर लवकरच लिहिले जाईल-'युद्ध नको, परस्परांना साहाय्य करा', 'विनाश नव्हे-आत्मसात करा','कलह नको-मैत्री व शांतता हवी'.

स्वामीजींच्या या भाषणाला यंदा १२५ वर्षे पूर्ण होत आहेत. आजही त्यांचे विचार सर्वांच्या भावनांना स्पर्श करतात नि प्रेरणा देतात.

## भगिनी निवेदिता यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त...



स्वामी विवेकानंद यांच्या पाश्चात्य शिष्या मागरिट नोबल याच पुढे भगिनी निवेदिता म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

मानवामध्ये चारित्र्य घडण करणारे शिक्षण स्वामीजींना अपेक्षित होते. त्यासाठी महान निश्चयाने कार्य करू शकणाऱ्या व्यक्ती त्यांना हव्या होत्या. त्यांच्या या आवाहनाला भगिनी निवेदिता यांनी प्रतिसाद दिला व स्वामीजींच्या कार्यात सहभागी झाल्या. त्यांनी भारतावर निस्सीम प्रेम केले.भारताची जीव ओतून सेवा केली. त्या प्रभावी वक्त्या होत्या, लेखिका होत्या.

भारतीय कलेतील प्राचीन परंपरा, पूर्णत्वाच्या कल्पना, चैतन्य, सर्जनशीलता यांच्याशी निवेदिता एकरूप झाल्या होत्या. पाश्चात्य कलेची परिमाणे लावून भारतीय कलेची समीक्षा करणे थांबले पाहिजे, असे मत भगिनी निवेदिता यांनी आग्रहाने नोंदवले. संस्कृती व कला हे निवेदितांचे आस्थेचे विषय होते. भारतीय कलेचे पुनरुज्जीवन करून त्याद्वारे समाज परिवर्तन आणि राष्ट्र जागरण करता येईल, असे मत त्यांनी व्यक्त केले होते.

२०१७-२०१८ हे भगिनी निवेदिता यांचे १५० वे जयंती वर्ष साजरे केले जात आहे. त्यांच्या एकंदर कार्याविषयी विचार-चिंतन करणे हे आपल्या स्वत:साठी आणि आपल्या राष्ट्राच्या भवितव्यासाठी अतिशय आवश्यक आहे.

## मा. कुलगुरूंचे मनोगत



जागतिकीकरणामुळे अन्य क्षेत्रांबरोबर शिक्षण क्षेत्रात ही वेगाने बदल झालेत. हे बदल प्रत्येक क्षेत्राच्या कार्यकक्षा रुंदावणारे आहेत. पूर्वीच्या तुलनेत त्यात अनेक नव्या घटकांचा अंतर्भाव झाला आहे. त्यात प्रामुख्याने शिक्षण व समाजातील विविध क्षेत्र ह्यांच्यात समन्वय असण्याची निकड निर्माण झालीय. अभ्यासक्रम, परीक्षा, पदवी ह्याच्या पलिकडच्या शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. केवळ वैयक्तिकच नव्हे तर सामाजिक जीवनातही शिक्षणाच्या उपयोगासंबंधी चिंतन सुरू झाले. आज समाजातील विविध समस्या व गरज लक्षात घेऊन संशोधनाची दिशा निश्चित करणे गरजेचे ठरत आहे. औद्योगिक व तंत्रज्ञानाच्या विकासासाठी शिक्षणात बदल व अभ्यासक्रमांची पुनर्रचना विचारात घेणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाचा संबंध बदलत्या उत्पादन प्रणालीशी व कुशल मनुष्यबळाशी जोडण्यावर भर दिला जातो आहे. संशोधनही उपयोजित स्वरूपाचे असावे, असा आग्रह धरला जाऊ लागलाय. आज शिक्षण हे चौकटबद्ध अभ्यासक्रम, वर्गखोल्यातून ठराविक पद्धतीचे अध्यापन आणि रूढ प्रकारच्या परीक्षा यांच्या पलीकडे जाणे गरजेचे आहे. आंतरविद्याशाखीय आणि उपयोजित प्रकारचे शिक्षण ही वर्तमान काळाची गरज बनली आहे. त्यामुळे आज विद्यापीठातील अभ्यासक्रमांची रचना करताना समाजातील विद्यार्थी, पालक आणि रोजगार देणाऱ्या संस्था इत्यादींचे मत लक्षात घेणे आवश्यक बनले आहे. जेणे करून विद्यार्थी समाजातील विविध क्षेत्रांमध्ये आपले अस्तित्व सिद्ध करू शकतील व समाजाचा उत्कर्षही साधू शकतील. अशा शिक्षणातून विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध व्हावा, ही बाब तर महत्त्वाची आहेच, पण त्यासोबतच त्यांना जीवन जगण्याची कलाही प्राप्त करता यावी, हा विचार महत्त्वाचा आहे. त्यातून शिक्षणाच्या कक्षा विस्तारण्यावर आज भर दिला जातो आहे. त्यामुळे आज शिक्षकांनाही आपला शिक्षण विषयक दृष्टीकोन अद्ययावत करणे आवश्यक आहे. जेणेकरून नव्या पिढीला कालानुरूप घडवता येणे सहज शक्य होईल. नवीन व्यवसाय आणि उद्योगांना आवश्यक असणाऱ्या कुशल मनुष्यबळाच्या दृष्टीने अभ्यासक्रमांची पुनर्रचना करण्यासाठी आपले विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशील आहे. नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, नॅशनल स्कील डेव्हलपमेंट एजन्सी अशा काही संस्थांप्रमाणेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांसाठी विशेष अभ्यासक्रम, प्रशिक्षण आणि उपक्रम राबविण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्या प्रयत्नांना विद्यार्थी, पालक आणि समाजातील जागृत नागरिकांनी प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षा आहे.

विद्यापीठातील व्हर्च्युअल सी फोर सेंटरद्वारा https://livestream.com/sgbau या संकेतस्थळावरून अलीकडे प्रसिद्ध झालेले काही भाग विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अतिशय उपयुक्त आहेत.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील व महाविद्यालयांतील ज्या विद्यार्थ्यांनी गेल्या शैक्षणिक वर्षात शिक्षण, संशोधन व इतर सामाजिक उपक्रमांत मोलाची कामगिरी बजावली, त्यांच्या कार्याची दखल 'ACE' च्या तिसऱ्या अंकात ही घेतलेली आहे. त्या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन व त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा !

डॉ.मुरलीधर चांदेकर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

## संपादकीय

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमाशी निगडीत तसेच अभ्यासेत्तर उपक्रमांमध्ये प्राप्त केलेली उपलब्धी तसेच पुरस्कारांना जन दृष्टीक्षेपास आणून त्यांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहित करण्याच्या मा. कुलगुरु महोदयांच्या अभिनव संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या 'ACE' या विद्यापीठ वार्तापत्राच्या प्रकाशित प्रथम व द्वितीय अंकाला आपण सर्वांनी भरभरून पसंती दिल्याने पुढील अंक प्रकाशित करण्यास आमच्या उत्साहात भर पडलेली आहे. या करिता मी मा.कुलगुरू महोदय, सर्व शिक्षक, सर्व विद्यार्थी वृंद तसेच संपादकीय मंडळाचे मनापासून आभार व्यक्त करतो. शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये विद्यार्थीभीमुख अशा या विद्यापीठ वार्तापत्राचा तृतीय अंक प्रकाशित होत आहे. मला विश्वास आहे की हा अंक देखील दर्जेदार, वाचनीय, तसेच संग्राह्य होईल.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानाची बाब म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या विद्यापीठाचे सन्मा. कुलगुरू डॉ.मुरलीधरजी चांदेकर महोदयांना राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषदेच्या कार्यकारी समितीवर नामीत केले आहे. मी मा. कुलगुरू महोदयांचे संपादक मंडळाच्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन करतो.

आपणासही या प्रकाशित होणाऱ्या तृतीय अंकामध्ये काही बदल अथवा सुधारणा सूचवायच्या असल्यास आपण आपल्या प्राचार्य/संस्थाप्रमुखांच्या शिफारशी द्वारे आमच्याकडे पाठवाव्यात. तसेच त्याची एक प्रत आपल्या जिल्ह्यातील समिती प्रमुखांकडे सुद्धा माहितीकरिता अग्रेषित करावी, अशी विनंती या आवाहनाद्वारे आपणास करतो.

डॉ.एस.एफ.आर.खाद्री

मुख्य संपादक,'ACE'

## Department of Lifelong Learning & Extension:

### Inaugural Function of Certificate Course in Textile Weaving :

Department of Lifelong Learning & Extension inaugurated Certificate course in Textile Weaving on 7th July, 2017. It is evident that one of the biggest textile park is under construction at Nandgaon Peth, Amravati. Companies like Suryalaxmi Cottton Industries, Shyam Indofab Ltd., Siyaram Silk Mills Ltd., Golden Fibre LLP, Raymond Luxury Cotton Ltd. have started their manufacturing. MoU has also been signed with these companies. Considering the need of Human Resources at the Textile Park, Syllabi of Certificate Course in Textile Weaving is formed by the Department of Lifelong Learning & Extension in Collaboration with HR representative of the above mentioned companies. Students who successfully completed this short-term certificate course would get preference in job in these companies. Besides, Convergence of Agriculture Interventions in Maharashtra (CAIM) sponsors 30 students from agricultural background to take admission for the course. Hon'ble Vice Chancellor Dr. Murlidhar Chandekar, Sant Gadge Baba Amravati University, Amravati inaugurated the function and expressed his thought on the utility of such short-term courses. He assured that such courses would be beneficial to fulfil the demand of skilled human resources at the textile park.




### PRAKSHAYAAN 'Solar Panel Manufacturing and Training Programme' :

Department of Lifelong Learning & Extension in collaboration with Shri. Shivaji Arts & Commerce College, Amravati & N.P.O. Solar Water Green Project, Japan organised Solar Panel manufacturing and Training Program from 2nd January 2018 to 17th January, 2018. Tsuki Consultancy Services Pvt. Ltd. fortune 4 Sun Power LLP also helped and supported the project. Total thirty-four participants including students, unemployed youth and curious professors of the affiliated colleges attended Solar Panel Manufacturing and Training Programme

In the inaugural function of Solar Panel Manufacturing and Training Programme. Hon'ble Pro-Vice Chancellor Dr. Rajesh Jaipurkar delivered a motivational speech to the participants. The program was featured in the presence of Dr. Ajay Deshmukh, Registrar, Principal Dr. Smita Deshmukh and Former Principal V.T. Ingole.




### भव्य विभागीय महारोजगार मेळावा :

महाराष्ट्र शासन, विद्यापीठ कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र अमरावती व आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य विभागीय महारोजगार मेळावा, विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे दि. १७ फेबु. २०१८ रोजी संपन्न झाला. शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने स्थानिक सुशिक्षित बेरोजगार युवकांना अमरावती परिसरातील औद्योगिक क्षेत्रामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा या शासनाच्या धोरणाला अनुसरुन महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. वैशिष्ट म्हणजे रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत अवलंबण्यात आली होती. कारण युवक/युवती ह्या एकवेळा www.mahaswyam.in या संकेतस्थळावर नोंदणी कृत झाल्यावर सदर पोर्टलवरील नोंदणीचे फायदे विद्यार्थ्यांना मिळतात.





महास्वयं पोर्टलमध्ये वरील सर्व सुविधा ह्या विनाशुल्क उपलब्ध असून याचा लाभ घेण्यासाठी सदर पोर्टलवर नोंदणी करणे अत्यावश्यक आहे. असे आवाहन याप्रसंगी करण्यात आले. १००० रिक्त पदाकरिता एकूण १२ कंपनी मध्ये ४५०० बेरोजगार युवक-युवती यांनी नोंदणी केली होती. यापैकी ९५० एवढ्या उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या.मा.डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या मार्गदर्शनात डॉ. श्रीकांत पाटील, संचालक, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, श्रीमती प्रांजली बारस्कर, सहाय्यक संचालक, विद्यापीठ कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, माहिती व मार्गदर्शन केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी काम पाहिले. याप्रसंगी मा. डॉ. राजेश जयपूरकर, प्र-कुलगुरु, मा.श्री.किरण पातूरकर, उपसंचालक एस.आर.काळबांडे उपस्थित होते.

### लघू माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा स्थापित करण्याकरिता प्रशिक्षण कार्यशाळा :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग व मा. खा. आनंदरावजी अडसुळ, मा. खा. रामदासजी तडस यांचे खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील ५७ महाविद्यालय/शाळा यांना लघू माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा स्थापित करून देण्यात आल्या. ५७ महाविद्यालय/शाळा मधील एक प्रयोगशाळा परिचर व एक माजी/आजी विद्यार्थी यांना दि. २० मार्च ते २४ मार्च २०१८ या दरम्यान प्रयोगशाळा चालविण्याकरिता प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची माती व गावातील पाणी परिक्षण करता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक शेतकऱ्यास Soil Health Card देण्याविषयी संकल्पना मांडली होती. ही संकल्पना पूर्णत्वास नेण्याचे काम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ करत आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांचे घरी Soil Health Card मिळण्यास मदत होईल. या माध्यमातून स्थानिक (ग्रामीण भागातील) ११० बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. हा नावीन्य उपक्रम मा. कुलगुरु मुरलीधर चांदेकर यांच्या पुढाकाराने संपन्न झाला.





## Achievements :

### Department of Zoology :



**# Dr. Kalpana A. Kalaskar**

Mentor: Dr. C. K. Deshmukh

A project sanctioned by DST under Women Scientist Scheme-B (WOS-B) entitled "Documentation of best conservation practices being followed by tasar silkworm, Antheraea mylitta rearers in villages to improve socio-economic status of the locals giving emphasis on the womenfolk" of Rs. worth 28.54 Lacs.

**Research Scholar :**

**# Irfan A. Badroo -**

First prize in Poster presentation in the field of subject Zoology.

1. National Conference in Recent Trends in Biotechnology and Biodiversity NCCB-2017 during 22nd-23rd Sept. 2017at Shri Shivaji Science College, Amravati

Title: Paraquat dichloride induced protein alterations in blood of Channa punctatus (Bloch).

**First prize in oral presentation in the Biological Sciences.**

2. International Conference on Recent Trends in Science and Technology on 22nd -23rd march, 2018 organised by S.S.S.K.R. Innani Mahavidyalaya, Karanja Lad.



Title: Biochemical response of fresh water teleost fish, Channa punctatus (Channidae: Perciformes) during acute exposure to paraquat dichloride.

### Post - Graduate Department of Law
### Sant Gadge Baba Amravati University, Amravati.

Socio-legal awareness camp under TRDEA scheme organised by P.G.T.D. of Law SGBAU, Amravati on 23-01-2018 at Bhagwantrao Kalaskar Vidyalaya Purna Nagar, Tq. Bhatkuli Dist. Amravati and At Bahiram Tq. Chandur Bazar Dist. Amravati. Students performed street play on various theme like female foeticide, protection of environment, child marriage, prevention of dowry and domestic violence.



**Ku. Kripalarani R. Bhisekar** student of P.G.T.D. of Law SGBAU Amravati has acquired 1st Merit position (LL.M.) in the academic year 2016-2017. She is seen accepting medal at the hands of Hon'ble Vice Chancellor Dr. Murlidhar Chandekar in the convocation programme dated on 23-2-2018.

### पदव्युत्तर मराठी विभाग :

एम.ए. मराठी भाग २ येथील विद्यार्थी अभिजित इंगळे यांनी 'नेट' परीक्षा देऊन प्रथम प्रयत्नात यश संपादन केले. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत विद्यापीठाच्या चमूला घवघवीत यश.**
**तीन संशोधक विद्यार्थ्यांनी मिळविले प्रथम पारितोषिक**

महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपतीतर्फे राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धा महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी याठिकाणी संपन्न झाली. यश पुरी याने यु.जी., प्युअर सायन्स गटात पहिले पारितोषिक, हर्षल पाटील याने यु.जी. इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नोलॉजी गटात प्रथम पारितोषिक व प्रतिक देशमुख याने ॲग्रीकल्चर ॲन्ड ॲनिमल हस्बंडरी–पी.जी वर्गवारीत प्रथम क्रमांक पटकाविला असून ॲग्रिकल्चर ॲन्ड ॲनिमल हस्बंडरीचे फिरते चषक पटकाविले आहे. आविष्कार समन्वयक डॉ. आनंद अस्वार आणि त्यांच्या चमूने अथक परिश्रम घेतल्यामुळेच विद्यापीठाला हे यश प्राप्त झाले.

**# Mr. Khushal Ingle:**



First prize in Oral presentation

1. National conference on Recent Trends in Synthesis and Characterization of Futuristic material in Sciences for the Development of Society organized by Late Bhaskarrao Shingane Arts, Prof. Narayanrao Gawande Sci. & Ashalata Gawande Comm. College, Sakharkherda

Title: Aphrodiasic activity of Acid Phos on male albino rat.



**# Ms. Pranita Wakode:**

I) Golden Girl-2017 of Sant Gadge Baba Amravati University

### Department of Chemistry :

# In the pure sciences category of Post-Graduate, one of our student Ms. Rupali D. Jadhav received 2nd prize & selected for State Level "Avishkar 2017-18" and shortlisted for oral presentation at Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri. She presented the research work entitled "An Ecofriendly and Expedient Synthesis of Hantzsch Pyridine Derivatives Using Titanium Dioxide" under the guidance of Dr. Manisha M. Kodape, Assist. Prof., Department of Chemistry, SGBAU, Amravati.

# Ms. Rupali D. Jadhav won the 1st Prize in Research Paper presentation competition & Dr. C.A. Ladole won the 2nd prize in the National Conference on "Recent Trends in Chemical Science" was organized by Shri. Shivaji Arts, Commerce & Science College, Akola.

### विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभाग :

# विद्यापीठाच्या पदव्युत्तर वनस्पतीशास्त्र विभाग येथील संशोधक विद्यार्थी विवेक नरखेडकर यांना विभागातर्फे आयोजित एरोबॉयलॉजीच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये सादर केलेल्या संशोधन निबंधास अतिशय प्रतिष्ठीत प्रा.डॉ.पी. एच.ग्रेगरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पराग कणांपासून उर्जा संवर्धन करून त्यापासून संपूर्ण हॅपलॉईड प्रजाती विकसित करणे, हा त्यांच्या संशोधनाचा विषय राहिला असून सी.आय.एस.आर.–नेट, सेट परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केल्या आहेत. राष्ट्रीय परिषदेमध्ये पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेतसुद्धा विवेक नरखेडकर यांना तृतीय पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले आहे.

**# मो.आबिद मलिक यांना संशोधनाचे राष्ट्रीय पारितोषिक**

वनस्पतीशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी मो.आबिद मलिक यांनी विभागातर्फे आयोजित एरोबॉयलॉजीच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये सादर केलेल्या संशोधन निबंधास द्वितीय पारितोषिक मिळाले असून त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### भौतिकशास्त्र विभाग :

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील अकरा विद्यार्थी नेट/सेट/जेस्ट/गेट ही कठीण्य पातळीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्याबद्दल त्यांचा कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी सत्कार केला. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, व्य.प.सदस्य तथा भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस.के.ओमनवार, कार्यकारी अभियंता श्री. शशीकांत रोडे उपस्थित होते. गेल्या पंचवीस वर्षात नेट/सेट/जेस्ट/गेट सारख्या राष्ट्रीय पातळीवर छप्पन्न विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. भौतिकशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभत असते. त्यांच्या नेतृत्वखाली भौतिकशास्त्र विभाग सातत्याने प्रगतीपथावर आहे.

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथील सामाजिक उपक्रम :

सामाजिक उपक्रमांतर्गत मोर्णा नदी स्वच्छता अभियान व कारागृह क्षेत्रभेट या उपक्रमाचे आयोजन शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे दि. १० फेब्रुवारी २०१८ आणि २८ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत करण्यात आले. बी. एड. प्रशिक्षणार्थीमध्ये सामाजिक बांधिलकी व ऐक्याची भावना तसेच राष्ट्रीय अस्मिता जोपासली जावी या उद्देशाने सदर आयोजन करण्यात आले. देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांनी सुरू केलेल्या राष्ट्रीय स्वच्छता अभियान कार्यक्रम देशपातळी वर राबविण्यात येत असतानाच अकोला शहरात मा. जिल्हाधिकारी श्री. आस्तिककुमार पांडेय व उपविभागीय अधिकारी श्री. संजय खडसे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या मोर्णा नदी स्वच्छता अभियानात महाविद्यालयांनी दि. १० फेब्रुवारी २०१८ रोजी सक्रीय सहभाग घेतला याप्रसंगी महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री व अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री मा. डॉ.रणजित पाटील उपस्थित होते. त्यांनी बी. एड. प्रशिक्षणार्थींनी दिलेल्या या सामाजिक योगदानाची त्यांनी दखल घेतली. शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला येथील नारीशक्तीचा मला सार्थ अभिमान आहे. या भावी शिक्षकांनी सामाजिक, राष्ट्रीय अस्मिता जोपासण्याचे मूल्य आपल्या अध्यापनातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे व ते निश्चितपणे हे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करतील हा आशावाद मला आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.




## Laddhad College of Pharmacy, Buldhana

### Awareness Rally Held on World T.B.Day




On the eve of World Tuberculosis Day on March 24 an awareness rally was held at Buldana on Saturday. District T.B. Office Administration, Buldana in association with Laddhad College of Pharmacy, Yelgaon, Buldana took initiative to organize the rally.Laddhad College of Pharmacy students participated in the rally displaying placards, banners and posters to spread awareness on tuberculosis among people. A road show was also arranged for educating the public regarding causes, symptoms, prevention and treatment of tuberculosis. Each year world T.B. Day is observed on March 24 to raise awareness about the devastating health, social and economic consequences of tuberculosis and to set up efforts to end the global T.B. problem.

## Late Pushpadevi Patil Arts & Science College, Risod, Dist. Washim.

Five days yoga Camp from 28 January to 01 February 2018 for Students & Citizens.




## स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महा., रिसोड, जि.वाशिम रा. से. यो. ने खोदले शेततळे :



स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर दत्तक ग्राम मांगवाडी येथे दि. २६/१/ २०१८/ ते २/२/ २०१८ या कालावधीत संपन्न झाले. या विशेष शिबिरात रा. से. यो. च्या स्वयंसेवकांनी ५० फुट लांब, ३० फुट रुंद, तर १५ फुट खोलीचे शेततळे श्रमदानातून तयार केले. याचा मोठा फायदा दत्तक ग्राम मांगवाडीला भूजल पातळी वाढण्यासाठी होणार आहे.

## Pankaj Laddhad Engineering College, Buldhana

### Pradhan Mantri Kaushalya Vikas Yojana :

The approval for the implementation of the Pradhan Mantri Kaushalya Vikas Yojana and the training center has been approved at Pankaj Laddhad Engineering College, Buldhana.

The objective of the Pradhan Mantri Kaushalya Vikas Yojana is to increase the skills of the students by providing them industry-related quality training and to increase the existing employment opportunities operating. For the last ten years, under the Pradhan Mantri Kaushalya Vikas Yojana Plan and MSDE, it has been approved for 2016-2020.

In view of the needs of young people who are socially deprived or unsafe and neglected sections of the society, they cannot reach primary education, they should get employment opportunity in less time and PMKVY is in the process of overall development. Different training centers have been set up under Pankaj Laddhad Engineering College, the curriculum is being started for construction (helper-construction laboratory and field technician, mason general), automotive vehicles (repair welder, dealership, telecaller, sales executive), Electronics Engineering (DTH set top box installation and service), information technology based services (Domestic data entry operator), Electrical Engineering (assistant electricity meter reader, billing and cash collector, consumer energy meter technician), etc. The students will be given a certificate after successful completion of this course. This certificate will be useful for all government, semi-government and private companies to get employment, informed Prof. N. A. Ingle. With the development of the poor and growing youths in the rural areas like Buldhana, along with the development of Buldhana district.

## नुरजहाँ बेगम सलाम अहमद कला व वाणिज्य महा.,वणी. जि.यवतमाळ.

### पुनवट येथे वाटर हार्वेस्टिंग

पाण्याचे योग्य नियोजन व पाण्याचा निचरा झाला नाही त्याकारणामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता ते नाल्याद्वारे वाहून जाते जमिनीमध्ये मुरल्या जात नसल्यामुळे मार्च, एप्रिल, मध्ये हातपंप, बोरवेल्स् मध्ये पाणी अडवले जाते. ही समस्या जाणून घेऊन महाविद्यालयातील रासेयोच्या पथकाद्वारे सप्टेबर २०१७ मध्ये वणी जवळ असलेल्या पुनवट येथे जाऊन सरपंचाची भेट घेऊन त्या गावी हातपंपा जवळ वाटर हार्वेस्टिंगचे काम करण्यात आले.



## STUDENTS ACHIEVEMENTS

### S. S. S. K. R. Innani Mahavidyalaya, Karanja (Lad) Dist. Washim

**Best Speaker Award :-**



**# Ms. Roshan Sheikh**, the student from B. A. III took active participation and proclaimed against 'Three Talak' in the 8th Indian Student Parliament M.I.T World Peace University Pune Meet Held from 19.1.2018 to 21.1.2018 at MIT College, Pune. She got the Best Speaker Award.

**Participated in R.D. Parade, New Delhi :-**



**# Ms. Megha Kotak**, the student from B. Sc. III participated in RD Parade held on 26th Jan. 2018 in New Delhi.

**Selected for Transform Maharashtra Leadership Ambassador Programme 2018:-**

**# Ms. Pooja Prakashappa Bonkile**



**A short Documentary on "Anti Ragging" :-**



A short Documentary on "Anti Ragging" was filmed under the guidance of Principal, Dr. P. R. Rajput. The Principal himself performed a main role along with the faculty members and the students. The shoot out of the scenes and direction of the film was done by the faculty, Mr. Raja Gore in the premises of the college.



**Mr. Prasad Solanke**, the student from B. Com. – II got 6th Rank in Loksatta Elocution Competition held on 7th Feb. 2018. Besides, he stood Third and got Prize of Rs. 3000/- in Swachhata Mitra Elocution Competition 2018. He also won First Prize in District Avishkar Competition 2018. He also won 1st Prize of Rs. 1000/- in Shivaji Maharaj Elocution Competition held at Kamargaon.

**Winner in Vidharbha Level Kabaddi Competition 2018 : -**



Mr. Dipak Kale, B.A.II, Mr. Pawan Gaikwad, B. A. II, Mr. Sadanand Dhope, B. A. II, Mr. Shubham Jadhav, B.Com.I, Mr. Nayan Shahakar, B.Com. I, Mr. Ankush Jadhav, 12th, Mr. Abhishek Shinde, 12th, Mr. Gajanan Jadhav, 11th, Mr. Ayush Gawande, 11th won Trophies in Vidharbha Level Kabaddi Competition 2018.

### SMT. L.R.T. COLLEGE OF COMMERCE, AKOLA



दिनांक २७ जानेवारी, २०१८ रोजी राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी पथसंचालनात सहभागी रासेयो स्वयंसेवक **नितिन राजुसींग सोळंके.**



अकोला येथील मोर्णा नदी स्वच्छता अभियानात रासेयोचा सक्रीय सहभाग. दिनांक १५ ते २५ जानेवारी, २०१८ दरम्यान जिल्हाधिकारी, अकोला यांच्या निर्देषानुसार मतदार जनजागृती निमित्य महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा व मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले तसेच रासेयोचा विद्यार्थी **शुभम अशोक दामोदर** याला निबंध स्पर्धेत जिल्हास्तरीय बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.



**N.C.C. Officer Lieutenant Dr. Anil Tirkar**, Smt. L.R.T. College of Commerce, Akola has been awarded by the honor of "Excellent NCC Officer of 11 Maharashtra Battalion of Akola" for 2017-18, which is prestigious award in N.C.C. Group at the hands of Brigadier of N.C.C. Amravati Group Mr. Sanjeev Yadav at N.C.C. Headquarter N.C.C. Bhawan, Amravati.


### महात्मा ज्योतिबा फुले, अमरावती.



सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर व्दारा आयोजित आंतर विद्यापीठीय सुगम संगीत स्पर्धेत एम.ए.(संगीत) भाग–२ चा विद्यार्थी प्रदीप रुईकर व बी. ए. भाग–२ चा विद्यार्थी ऋषिकेश ढोके यांनी प्रथम क्रमांकाचे चषक प्राप्त केल्याबद्दल महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतांना मा. कुलगुरु डॉ. मुरलीधरजी चांदेकर व अस्मिता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. मुरलीधरजी भोंडे.

### गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुर बाजार, जि.अमरावती.

**राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत : शुभम झाडे द्वितीय**



गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चांदुर बाजार येथील मराठी विभागातील विद्यार्थी **शुभम नांदकिशोर झाडे** एम.ए.(भाग १) मराठी हा दि. ६ डिसेंबर २०१७ ला महापरिनिर्वाण दिनानिम्मित्त नागपूर येथे आयोजित राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत त्याचा द्वितीय क्रमांक आला . कवितेचे शीर्षक 'बाबासाहेबांचे शब्द' हे होते . ही कविता त्याने सादर केली . त्याबद्दल त्याला प्रमाणपत्र , ११०००/– रु रोख रक्कम , स्मृतिचिन्ह मान्यवरांनी दिले.

# STUDENTS ACHIEVEMENTS

## P. R. Patil College of Engineering & Technology Amravati. (Maharashtra)

1) Name of Project : Tiger Tech 2018, organized by Melghat Tiger Reserve.

Developing prototype model "SMART ELECTRICITY"

Achievement : 1st price of V.N.I.T. – National Competitions price of Rs.21,000/- Organized by: V.N.I.T. Nagpur.

Name of the students : 1.Ritesh D. Bhudke 2.Kiran G. Bhele 3.Ku. Vrushali P. Pere 4.Ku. Anushree R. Dhule 5.Kiran S. Patil 6.Madhav S. Gangane

**Ku. Priyal Pramodrao Kajalkar,** 1st merit among all students of all Engg. colleges in S.G.B. Amravati University, Amravati.

## P.R. Pote Patil Edu. & Welf. Trust's Group of Institutions College of Engineering & Management, Amravati.



**# Ms. Apeksha Rajendra Umate**
SGBAU Topper in All Branches

# National level Project competition conducted by BHAU Foundation at COEP Pune on 14th -15th April 2018 and stood II rank in 3H and Environment sector.



## Babasaheb Naik College of Engineering, Pusad

**Ms. Vaishnavi Panchariya ( 3rd Year Computer) & Ms. Sakshi D.Padmawar (3rd Year Computer):-** Have actively participated and secured Second Rank in National Level workshop cum competition on **IoT's – Internet of Things** At Govt.College of Engineerting , Amravati on 6th & 7th Jan,2018.

## दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय, मलकापूर, जिल्हा बुलडाणा

| अनु.क्र | कार्यक्रमाचे नाव व दिनाक | स्तर | नैपुन्य | सन्मान / बक्षीस |
|---|---|---|---|---|
| १ | आंतरराष्ट्रीय युवा दिन , वक्तृत्व स्पर्धा दि.१२/०८/२०१७ | जिल्हास्तरीय | तृतीय क्रमांक | प्रमाणपत्र |
| २ | पुरवठा व स्वच्छता विभाग पंचायत समिती मलकापूर. तर्फे वक्तृत्व स्पर्धा दि. ०६/०१/२०१८ | तालुकास्तरीय | तृतीय | प्रमाणपत्र व रोख बक्षीस |
| ३ | स्वच्छ भारत-स्वस्थ भारत रा.से.यो.शिबिरात सहभागी दि.०६ /०२/२०१८ ते १३ /०२/ २०१८ | जिल्हास्तरीय | उत्कृष्ट स्वयं-सेविका | प्रमाणपत्र |

## Matoshri Vimlabai Mahavidyalaya, Amravati.

# C.D.T. Priyanka G. Dube received Chief Minister's Scholarship of Rs. 2000/-



# Ku. Priya R. Raut selected for N.S.S. Pre-R.D. Parade, Hyderabad & Mumbai.



## Jawaharlal Darda Institute of Engineering & Technology., Yavatmal .

| Sr. No. | Name of Student/ Class | Topic | National & International | Conference Name | Organized By | Date of Event | Prize Winning |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Ankit Bhaskar Mohurle<br>Sumit Ashok Ade<br>Vinay Madhukar Kathole<br>- Chemical Engg. Final Year | Grain Dryer | National | NCOAT-NIRMITI-2018 | Priyadarshini Institute of Engineering & Technology, Nagpur | 17th February, 2018 | First Prize |
| 2 | Tejal Dhankhade<br>Anchal Palange<br>Piyush Sorate<br>-Electrical Engg.- Second Year | Sustainable Development in Engineering for Better Future : A review | National | IETE Zonal Seminar | JDIET, Yavatmal | 8 Dec 2017 | Best paper Award |
| 3 | Shankar Pawar<br>Vrusabh Bhagadkar<br>Saurabh Jirapure<br>-Electrical Engg. –Third Year | Photovoltaic Thermoelectric Solar Generation Technique | National | IETE Zonal Seminar | JDIET, Yavatmal | 8 Dec 2017 | Best paper Award |
| 4 | Aniket R Ingole<br>-Civil Engg. – Third Year | Electronic Waste Recycler y Using Process of Distillation System of Collecting E Waste & Use of Drop Box | International | IASTEM International Academy of Sciences | Phuket, Thailand | 7 Oct.,2017 | |
| 5 | Jitesh Fulbandhe<br>-Electrical Engg. –Final Year | Hybrid Electric Car | National | All India Seminar on Green Energy | Vanmati Insititurte of Agriculture & Training, Nagpur | 10 March, 2018 | 3rd prize |
| 6 | Aniket R Ingole<br>-Civil Engg. – Third Year | Eco Friendly Compressed Brick | Patent | Patent Application No 201821002412 | | 2 Feb., 2018 | |
| 7 | Aniket R Ingole<br>-Civil Engg. – Third Year | Advanced Waste Management System | Patent | Patent Application No 201821008030 | | 16 Feb., 2018 | |
| 8 | Aniket R Ingole<br>-Civil Engg. – Third Year | Improvement of Properties of Black Cotton soil | National Conference | IETE Zonal Seminar | | 17 March,2018 | |
| 9 | Aniket R Ingole<br>-Civil Engg. – Third Year | Bio Enhancer Using Bio waste | International Journal | | | 28 Dec., 2017 | |
| 10 | Miss.Divya J Sodha<br>-Computer Sc & Engg-Final Year | Project Presentation Security And Privacy In Smart City | National Conference | TechnoXtreme-2018 | JDIET, Yavatmal | 17 March, 2018 | First prize |

# STUDENTS' ACHIEVEMENTS IN SPORTS

**उत्कृष्ट खेळाडू (मुली) :**

**कु. नेहा अनिल रोठे,** जय बजरंग शारीरिक शिक्षण महाविद्यालय, कुंभारी हिला अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सींग स्पर्धेत (मुली) आयोजक : पंजाब विद्यापीठ, चंदीगढ मध्ये सुवर्ण पदक प्राप्त.

**चमू व्यवस्थापक/प्रशिक्षक :**

१. डॉ. प्रा. रश्मी पी. गजरे श्रीमती नानकीबाई वाधवानी कला महा, यवतमाळ

२. डॉ. प्रा. एस.बी. जाधव श्रीमती नानकीबाई वाधवानी कला महाविद्यालय,यवतमाळ

**उत्कृष्ट खेळाडू (मुले) :**

१)श्री.गिरीश रत्नाकर कुकडे, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती ह्याने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ आर्चेरी (धनुर्विद्या) आयोजक विद्यापीठ: कलिंगा इन्स्टिटयुट ऑफ इंडस्ट्रीयल टेक्नॉलॉजी (के.आय.आय.टी.),भुबनेश्वर मुलांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन केले.

१. इंडियन राऊंड (ओव्हरऑल) सुवर्ण पदक २. ५० मीटर रौप्य पदक

३. ३० मीटर रौप्य पदक ४. ओव्हरऑल रौप्य पदक

२) श्री महेश बोथीकर,स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ सायन्स, टेक्नॉ. व मॅनेजमेंट, वाशिम

इंडियन राऊंड (ओव्हरऑल) सुवर्ण पदक

३) श्री रोशन सोळंके, प्रा.राजाभाऊ देशमुख महाविद्यालय,नांदगांव खंडेश्वर

१. इंडियन राऊंड (ओव्हरऑल) सुवर्ण पदक २. ३० मीटर कास्य पदक

३. ओव्हरऑल कास्य पदक

४) श्री. राजेश नरझारी, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन,अमरावती

१. इंडियन राऊंड (ओव्हरऑल) सुवर्ण पदक २. ५० मीटर सुवर्ण पदक

५) श्री तुषार शेळके, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती

१. रिकव्हर राऊंड (ओव्हरऑल) सुवर्ण पदक २. ७० मीटर रौप्य पदक

३. ऑलंपिक रौप्य पदक ४. ओव्हरऑल कास्य पदक

६) श्री प्रविण जाधव, श्री शिवाजी कला, वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

१. रिकव्हर राऊंड (ओव्हरऑल) सुवर्ण पदक २. ऑलंपिक सुवर्ण पदक

७) श्री सुखमनी बाबरेकर, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय,अमरावती

१. रिकव्हर राऊंड (ओव्हरऑल) सुवर्ण पदक

८) श्री अक्षय टेकाडे, श्री शिवाजी कला, वाणिज्य महाविद्यालय,अमरावती

१. रिकव्हर राऊंड (ओव्हरऑल) सुवर्ण पदक

९. कु. दामिनी बोरो, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन,अमरावती

१. इंडियन राऊंड ३० मीटर कास्य पदक

**चमू व्यवस्थापक/प्रशिक्षक :**

१. डॉ. आर.ए. गावंडे, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ

२. श्री.विकास वानखडे, अमरावती

३. प्रा. नितेश मांगुळकर, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन,अमरावती

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ भारोत्तोलन (मुले व मुली)

आयोजक : चंदीगढ विद्यापीठ, मोहाली

१. श्री महेंद्र कंडेरा, कला महाविद्यालय, येवदा रौप्य पदक

२. कु. दिपाली देवकर, कला महाविद्यालय, येवदा कास्य पदक

**चमू व्यवस्थापक/प्रशिक्षक:**

१. प्रा. उमेश कुहाडे, श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड.

२. प्रा. कैलाश कराळे, श्री नरसिंग महाविद्यालय, आकोट

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मैदानी स्पर्धा (मुले)

आयोजक: आचार्य नागार्जुना विद्यापीठ, गुंटूर

१. श्री किशोर जाधव, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती चतुर्थ स्थान

**चमू व्यवस्थापक/प्रशिक्षक:**

१. प्रा. राज एस. देशमुख,प्रा.राम मेघे इन्स्टि. ऑफ टेक्नॉ. ॲन्ड रिसर्च,बडनेरा रेल्वे

२. प्रा. सुरज बांगडे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन,अमरावती

## Prof Ram Meghe College of Engineering & Management, Badnera-Amravati.



# Rushabh S. Kshirsagar, 4th Year EE, Securing 3rd Rank in Act-Play in the Inter-University National Youth Festival held at Ranchi University among 108 Universities.

## स्व.भास्करराव शिंगणे कला,प्रा.नाररयणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा.



# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे आयोजित उत्कर्ष १०वी राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाविद्यालयाच्या रा.से.यो पथकाचा विद्यार्थी विजय दिनकर गवई याने सं.गा.बा.अ.वी च्या समूह गीत चमू मध्ये प्रतिनिधित्व केले असून विद्यापीठ चमूने समूह गीतामध्ये दुसरा क्रमांक प्राप्त केला.

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये ५७ किलो वजनी गटात प्रदीप शे. गोरे याने उत्तम कामगिरी करीत खाशाबा जाधव राज्यस्तरीय संघात स्थान प्राप्त केले.

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये ५३ किलो वजनी गटात कु, पूजा सं.भराड हिनी उत्तम कामगिरी करीत खाशाबा जाधव राज्यस्तरीय संघात स्थान प्राप्त केले.

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये ५५ किलो वजनी गटात ऋषिकेश भ. चाळगे याने उत्तम कामगिरी करीत खाशाबा जाधव राज्यस्तरीय संघात स्थान प्राप्त केले.

## Late Pushpadevi Patil Arts & Science College, Risod, Dist. Washim.



# Mr. Viswas Kailash Khandare represented at National Level Tournament in Kabaddi at Cuttak, Orrisa on 11 to 15 Dec. 2017.

## Arts, Science and Commerce College, Chikhaldara, Distt. Amravati

A model presented by the students of Arts, Science and Commerce College, Chikhaldara got first prize at University Level Research Festival 'Avishkar' held at S.G.B. Amravati University Amravati on 28th -29th December 2018 in the category Commerce, Management, Law etc (UG).



· Ku. Gayatri R. Zade (B.Sc. II) selected in the university team and participated in State Level Avishkar held at Mahatma Fule Krush iVidyapeeth Rahuri on 15th -16th January, 2018.

Arts, Science and Commerce College, Chikhaldara's four students named **Vivek Koudele, Vishal Dhote, Raj Sisodiya, and Lokesh Rangari** have been selected in Sant Gadge Baba Amravati University, Amravati Kho-Kho Men team for Krida Mahostava Inter-University tournament held at BalaSaheb Sawant Kokan Krushi Vidyapith,Dapoli, Dist.Ratanagiri and Inter-University West zone tournament held at Swami Ramanand tirth Marathwada University, Nanded Nutan college Selu, Distt. Parbhani from 02 January 2018 to 06 January 2018.



· **Lokesh Rangari** and past student **Nitin Nandurkar** of Arts, Science and Commerce College, Chikhaldara Dist. Amravati represented Vidarbha Kho-kho team for Senior National Kho-Kho Tournament held at Ichalkaranji Dist. Kolhapur, Maharashtra from 25th December 2017 to 29th December 2017.

## Brijlal Biyani Science College, Amravati.

### Academic tour to Indian Space Research Organization (ISRO) Thumba, Trivandrum)

The Post-Graduate students of Department of Electronics of Brijlal Biyani Science College, Amravati has visited to Indian Space Research Organization (ISRO) at Thumba, Trivandrum & Vikram Sarabhai Space Centre (VSSC) on Wednesday,17th January 2018 .

Initially Technician checked all the primary launching conditions of the Rocket, then after final confirmation reverse countdown of Rocket Launching is start. 10, 9, 8, 7, 6......3, 2, 1, 0 and suddenly Rocket is Launched into the sky with high speed and immemorial sound. After that we visited to Vikram Sarabhai Space Centre (VSSC). In this centre, display of different models and charts of the entire mission initiated by ISRO was presented. They displayed the complete information from the beginning scenario of ISRO to the recent and with future scenario. They were also displays of some actual and dummy models of different satellite which already launched in space. For communication, weather forecasting, volcanic information, natural disaster information. They also gave the whole information of the SLV-3, GSLV, Aryabhata, Kalpana-1, Bhaskara, HAMSAT, Aditya-L1, GSAT-3, IRS-1A etc, which they already launched in the space. They also displayed different mechanical and physical parts of satellite with complete information. Finally one movie based on complete journey of ISRO was shown, so that students could properly understood the whole conceptual term of satellite.



## शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ.

शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळचा विद्यार्थी श्री. शिवम रामराव राठोड यांना मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोशल मीडिया महामित्र पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले. सध्याच्या युगातील वेगवान संपर्काचे साधन असलेल्या सोशल मीडियाचा विधायक उपयोग आणि तोही शासनाच्या योजनांसाठी व्हावा आणि त्या माध्यमातून तरूणांना वाव मिळावा, या उद्देशाने राज्याच्या माहिती व जनसंपर्क विभागातर्फे सोशल मीडिया महामित्र हा उपक्रम राबविण्यात आला.

## ENTREPENUERSHIP AWARENESS CAMP (EAC) REPORT

Post Graduate department of Electronics of Brijlal Biyani Science College, Amravati and MIT-Technology Business Incubation Center, Pune has jointly organized ENTREENUERSHIP AWARENESS CAMP (EAC) promoted by National Science & Technology Entrepreneurship Development Board (NSTEDB), Department of Science & Technology and Government of India on 12th to 14th March 2018. For the Inaugural function, Shri Shivajirao Zombade (Poshak Industries Pvt. Ltd, Karnal, Haryana) was Chief Guest, Mr. R.H.Navandar was in the Chair, Mr. Ravindra Birje (CEO, MIT-TBI, Pune), Dr. N.G.Belsare was guest of honour, Dr. D.T. Ingole (Prof. Ram meghe Institute of Research & Technology, Badnera), Dr. D.S.Dhote (Co-ordinator) were present for the function. Academicians, Research Students & PG students of different institution of all over the region were present for this inauguration ceremony.



## Shri. Vyankatesh Arts, Commerce and Science College, Deulgaon Raja, Dist. Buldana.

| Sr. No. | Name of the student / Department | Nature of Achievement | Name of Activity/Event |
|---|---|---|---|
| 1. | The NSS Programme Officer | Best NSS Programme Officer Award at State Level | The NSS Programme Officer of the college received Best NSS Programme Officer award at state level for his outstanding work of social activities in 2016-17. |
| 2. | Shubham Pravin Boarde (B.Sc.III) | Participation at National Level | Represented Maharashtra Directorate at annual Republic Day Camp and the Prime Minister Rally held at New Delhi |

## श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम

मा.कुलगुरु डॉ मुरलीधर चांदेकर सं.गा.बा.अ.वि. यांच्या कडून स्वच्छता पुरस्कार २०१७ स्वीकारतांना प्राचार्य डॉ. एस.एन.शिंदे, कार्यक्रम अधिकारी, सहा. प्रा.ए. पी. राऊत, सहा. प्रा.ए.टी.वाघ.




## EDITORIAL BOARD

*** Chief Editor***

**Dr. S.F.R. Khadri**

Director, IQAC

*** Editors***

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Dr.A.M.Asanare | Dr.Mrs.M.M Chimote | Dr.G.L.Gulhane | Dr. S.P. Joshi | Dr. Vilas Nandurkar |
| Dr. H.S. Lunge | Dr. Mahendra Mete | Shri. Vivek Hiware | Dr. Ashalata Raman | Prof. A.A. Nandgaonkar |
| Ms. J.S. Patil | Dr. Ajay B. Lad | Shri. Pravin Hamjade | Shri. S.S. Muley | Prof. G.R. Jadhao |



Address For Correspondence : Chief Editor, Sant Gadge Baba Amravati University Bulletin "ACE", Internal Quality Assurance Cell (IQAC), Sant Gadge Baba Amravati University, Amravati (M.S.)-444602 Tel. (0721) - 2660896 Mob.-9423425393, email:diriqac@sgbau.ac.in



**Published by : Dr. Ajay Deshmukh, Registrar, Sant Gadge Baba Amravati University, Amravati - 444602**